**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. राजकुमार संदिपान जाधव
मु.पो.महूद बु.ता.सांगोला, जि.सोलापूर **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
तहसीलदार सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** नायब तहसीलदार,
तहसीलदार सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२०.११.२००८ |
| **३.** | **उपस्थित** | |

**जन माहिती अधिकारी तथा** नायब तहसीलदार,
तहसीलदार सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्रीमती शिल्पा रमेश ठोकडे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१०.०४.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२०.०४.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१३.०७.२००७ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २४.०७.२००७ |
| ७ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या सर्वेक्षणाबाबतची नामंजूर झालेल्या व्यक्तींबाबतची कारणांसह यादी मिळाली नाही, म्हणून अपीलकर्ता श्री.राजकुमार संदिपान जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.जाधव यांना विहित मुदतीत माहिती देण्यात आली. तसेच सर्व अपिले पाहणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आली. तत्कालीन तहसीलदार श्री.एन.वाय.सकटे यांनी तक्रारी अर्जावर मंजूर शेरे मारलेले नाही व सह्या केलेल्या नाहीत. तसेच कारणांची विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही, असे श्री.जाधव यांना स्पष्ट करण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,तहसीलदार सांगोला, ता.सांगोला, जि.सोलापूर श्रीमती शिल्पा रमेश ठोकडे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. हे लक्षात घेता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : २३/१२/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुरेश बाबुराव कोले — अपीलकर्ता
घ.नं.५४४-सी वॉर्ड, रविवार पेठ,
सबजेल समोर, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा ता. मावळ, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपनिरीक्षक, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा, ता. मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.३.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. सुरेश बाबुराव कोले
घ.नं.५४४-सी वॉर्ड, रविवार पेठ,
सबजेल समोर, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा — प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा
ता. मावळ, जि. पुणे श्री. महेश र. घुर्ये

**जन माहिती अधिकारी** तथा — पोलीस उपनिरीक्षक, पोलीस प्रशिक्षण विद्यालय,
खंडाळा, ता. मावळ, जि. पुणे
श्री. नविंद्र पुंडलिकराव देशमुख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १८.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २२.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २८.११.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

आपल्याला अपुरी व दिशाभूल करणारी माहिती दिली. तसेच दिलेली माहिती साक्षांकित करण्यात आली नसल्यामुळे या माहितीची सत्यता सिध्द होत नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. सुरेश बाबुराव कोले यांनी केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपनिरीक्षक, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा,खंडाळा, श्री. दि. म. सावंत यांनी श्री. कोल्हे यांना विहित मुदतीत माहिती दिली आहे. त्यांच्या तीन अर्जांवरील कार्यवाहीबाबतची माहिती जाणीवपूर्वक टाळण्यात येत आहे, या त्यांच्या आरोपात तथ्य नाही, असे प्रतिपादन विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपनिरीक्षक, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा, श्री. नविंद्र पुंडलिकराव देशमुख यांनी केले. माहिती व्यक्तिशः घेणार असल्याचे नमूद करुनही अपीलकर्ता माहिती नेण्यास येत नाहीत. प्रथम अपिलाच्या सुनावणीसही ते उपस्थित नव्हते. माहिती घेण्याबाबत त्यांना त्या त्या वेळी पत्र पाठविण्यात आले, असे अपिलीय प्राधिकारी तथा प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा, श्री. महेश र. घुर्ये यांनी संबंधित कागदपत्रांच्या प्रतीसह नमूद केले.

श्री. कोले यांच्या मागणीप्रमाणे प्रती साक्षांकित करुन द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार आपल्याला माहिती मिळाली नाही, अशी तक्रार श्री. कोले यांनी केली. मात्र श्री. कोले दि. २४.७.२००६ पासून विनापरवाना गैरहजर असल्याने त्यांच्या विरुध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. दि. १९.३.२००९ रोजी आयोगापुढील सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या आदेशानुसार श्री. कोले यांना मूळ अर्जातील मागणीनुसार कागदपत्रांच्या प्रमाणित केलेल्या प्रती देऊ केल्या असता त्यांनी त्या स्वीकारलेल्या नाहीत व 'रजिस्टर्ड टपालाने आपल्याला त्या पाठवा,' असे सांगितले. त्यामुळे दि. २३.३.२००९ च्या पत्रान्वये त्यांना रजिस्टर्ड टपालाने पाठविण्यात आल्या आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपनिरीक्षक, पोलीस प्रशिक्षण विद्यालय, खंडाळा श्री. देशमुख यांनी दि. ४.४.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. मात्र आपल्याला अद्याप माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री. कोले यांनी दि. २.९. २००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता ही तक्रार निराधार आहे, असे स्पष्ट होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. १९.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सुभाष बबनराव ऊर्फ आप्पासो जेबले — अपीलकर्ता
कसबा पेठ, पवार गल्ली, केबलवाले खरात
यांचे शेजारी, फलटण, जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याध्याधिकारी, फलटण नगरपरिषद, फलटण — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, फलटण नगरपरिषद, फलटण

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १८.३.२००९ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — श्री. सुभाष बबनराव ऊर्फ आप्पासो जेबले
कसबा पेठ, पवार गल्ली, केबलवाले खरात यांचे
शेजारी, फलटण, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा — मुख्याध्याधिकारी, फलटण नगरपरिषद, फलटण
श्री. श्री. दत्तात्रय कृष्णाथ नलवडे

**जन माहिती अधिकारी** तथा — उप अभियंता, फलटण नगरपरिषद, फलटण
श्री. जीवन सदाशिव केंजळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २६.५.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.८.२००८ |

| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

रस्त्याच्या मालकीविषयी आपण केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, फलटण नगरपरिषद, फलटण यांनी खोटी माहिती दिली. रत्याची जागा खाजगी व्यक्तीच्या नावावर असताना नगरपरिषदेने त्यावर ५०,०००/- रूपये खर्च केले असून जागा नगर परिषदेच्या ताब्यात असल्याचे उत्तर आपल्याला जन माहिती अधिकाऱ्यांनी दिले, म्हणून संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. सुभाष बबनराव ऊर्फ आप्पासो जेबले यांनी केली.

संबंधित जागा ताब्यात घेण्यासंबंधीच्या सर्व पत्रव्यवहाराच्या व आदेशांच्या प्रती अपीलकर्ता यांना दिल्या. जागेबाबत संबंधित मालकांनी नगरपरिषदेला लिहून दिले असून दानपत्र केलेले आहे. नगर परिषदेचे नाव त्यावर नोंद व्हावे यासाठी तलाठ्याकडे अर्जही केलेला आहे. ही सर्व माहिती व त्याबाबतच्या प्रती श्री. जेबले यांना देण्यात आल्या आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, फलटण नगरपरिषद, फलटण श्री. जीवन सदाशिव केंजळे यांनी केले.

संबंधित जागा खाजगी मालकीची असून नगरपरिषदेकडे रस्त्यासाठी सुपूर्त करण्याबाबत पत्रव्यवहार झालेला आहे. याबाबत उप विभागीय अधिकारी, फलटण उपविभाग, फलटण यांनी जिल्हाधिकारी, सातारा यांच्या आदेशानुसार चौकशी केली असून जागेचे हस्तांतरण नोंदणीकृत असणे गरजेचे असल्याचा अहवाल दिला आहे. नगरपरिषदेने जरी सार्वजनिक प्रयोजनासाठी रस्त्यावर खर्च केला असला तरी रस्त्याची जागा खाजगी मालकीची आहे, असे या अहवालात म्हटले आहे. नोंदणीची प्रक्रिया सुरू आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याध्याधिकारी, फलटण नगरपरिषद, फलटण श्री. डी. के. नलवडे यांनी केले.

नोंदणीची प्रक्रिया चालू असल्याने जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती खोटी आहे, असे म्हणता येणार नाही. नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतच्या प्रती अपीलकर्त्यास द्याव्या, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, फलटण नगरपरिषद, फलटण श्री. जीवन सदाशिव केंजळे यांनी आयोगास पंधरा दिवसांत सादर करावा.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ११.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. धनंजय अनिल मद्रवाणणा
सि.स.नं.३९५, पवार तालीम जवळ,
सांभारे रोड, गावभाग, सांगली

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-०४ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१२ + ५२६ /सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.४.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-०४ तर्फे प्रतिनिधी श्री. डी.टी. शिर्के<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर श्री. डी.टी. शिर्के | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ५.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.१२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

विद्यापीठ शैक्षणिक अभ्यासक्रमाकरिता महाविद्यालयाच्या वतीने आकारल्या जाणाऱ्या प्रवेश अर्ज व माहिती पुस्तिका यांच्या मूल्यांबाबतची माहिती जन माहिती अधिकारी तथा संचालक,

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, यांनी चुकीची, अपुरी व असमाधानकारक दिली. तसेच अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी माहिती अधिकार कायद्याच्या कार्यपध्दतीप्रमाणे कामकाज केले नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. धनंजय अनिल मद्‌वाण्णा यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्री. मद्‌वाण्णा यांच्या अर्जावर शुल्क भरण्याबाबत विहित मुदतीत कळविले होते. परंतु माहिती अपूर्ण, स्पष्ट अर्थबोध न होणारी व असमाधानकारक असल्याचे नमूद करून श्री. मद्‌वाण्णा यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. अपिलाच्या सुनावणीच्या वेळी झालेल्या चर्चेनुसार इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांची रक्कम परत केल्याबाबतची कागदपत्रे त्यांना त्याच दिवशी पाहण्यास उपलब्ध करून दिली. कागदपत्रांची पाहणी केल्यावर समाधान झाल्याचे त्यांनी सांगितले. मात्र 'माहिती अधिकाराच्या नियमावलीप्रमाणे कामकाज झाले नाही. वेळेत माहिती मिळाली नसल्यामुळे माहिती निःशुल्क मिळावी,' असे पत्र श्री. मद्‌वाण्णा यांनी त्याच दिवशी पाठविले, त्यामुळे कागदपत्रांच्या प्रती साक्षांकित करून पुन्हा पाठविल्या. माहिती देण्याबरोबरच महाविद्यालयांच्या माहिती पुस्तकांच्या किंमतीमध्ये समानता व माफकता येण्यासाठी विद्यापीठ प्रशासन व्यवस्थापन परिषदेपुढे विषय ठेवून या संदर्भात त्रिसदस्यीय समिती नियुक्त केली. तसेच माहिती पुस्तकांचे शुल्क रू. २०/- इतके आकारण्याचे बंधनकारक असल्याचे व त्यापेक्षा अधिक शुल्क आकारल्यास महाविद्यालयाने ती रक्कम विद्यार्थ्यांना परत करण्याबाबतचे पत्र सर्व संलग्न महाविद्यालयांना व संस्थांना पाठविले. या स्वरुपाची प्रशासकीय कार्यवाहीही करण्यात आली. याच संदर्भात श्री. मद्‌वाण्णा यांनी दि. १६.२.२००८ रोजी पुन्हा माहिती अधिकारात अर्ज करून दि. १.१.१९९७ ते दि. १.१.२००८ पर्यंतची १० वर्षांची माहिती विशिष्ट नमुन्यामध्ये मागितली. त्याबाबत कळविलेले शुल्क त्यांनी भरले नाही. तथापि खास बाब म्हणून अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी दिलेल्या आदेशानुसार काही माहिती निःशुल्क पाठविण्यात आली. श्री. मद्‌वाण्णा एकाच विषयावर सातत्याने विविध स्वरूपाचा पत्रव्यवहार व माहिती अधिकारातील अर्ज करीत राहतात. तांत्रिक मुद्दे उपस्थित करून शुल्क भरण्याबाबत आक्षेप घेतात. ज्या कागदपत्रांचे शुल्क पूर्वनिर्धारित केले आहे, ते आकारण्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये नियमावलीत मान्यता दिलेली असूनही श्री. मद्‌वाण्णा तसे शुल्क भरत नाहीत. अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून सुनावणीच्या वेळी समाधान झाले असल्याचे नमूद करतात व त्यानंतर त्याच संदर्भात आक्षेप घेणारी पत्रे देतात. या सर्व बाबींमुळे कार्यालयीन यंत्रणेवर आकारण ताण निर्माण होतो, असे अपिलीय प्राधिकारी

तथा कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर डॉ. एम.एम. साळुंखे यांचे लेखी निवेदन पूर्वी सादर करण्यात आले असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी संबंधित पत्रांच्या प्रतीसह नमूद केले. ढोबळ स्वरूपात माहिती मागणारे, अनेक मुद्दे व खुलासा मागण्याच्या स्वरूपाचे प्रश्न, तसेच प्रदीर्घ कालावधीतील विस्तृत माहिती मागणारे अनेक मुद्दे श्री. मद्वाण्णा एकाच अर्जात मांडत असतात. काही महाविद्यालयांच्या संदर्भातील माहिती त्यांनी त्या त्या महाविद्यालयाकडे मागणे आवश्यक असताना त्याचीही माहिती ते विद्यापीठाकडे मागतात, तीही दिली जाते. नेमकेपणाने त्यांनी माहिती मागितल्यास विद्यापीठाच्या कक्षेतील कोणतीही माहिती देण्यास विद्यापीठ तयार आहे, असे जन माहिती अधिकारी तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, श्री. डी. टी. शिर्के यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने लक्षात घेता श्री. मद्वाण्णा यांनी अपील क्र.५२६ मध्ये १० वर्षांतील व अपील क्र. ५१२ मध्ये २० वर्षे कालावधीतील अशी विस्तृत माहिती मागितली आहे. अपीलकर्त्यास शुल्काबाबत जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत कळविले आहे. तसेच विस्तृत स्वरूपाची व प्रदीर्घ कालावधीतील माहितीची मागणी ते करीत असतात, हे जन माहिती अधिकारी तथा संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर श्री. डी. टी. शिर्के व अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर डॉ. एम.एस. साळुंखे यांचे निवेदन रास्त असल्याचे कागदपत्रांवरुन दिसते. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी त्याबाबत केलेली कार्यवाही योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपीलकर्त्यास आवश्यक असल्यास अभिलेखांचे अवलोकन करून आवश्यक प्रती नियमानुसार शुल्क भरुन प्राप्त करून घेता येतील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**पुणे**
**दि. २१.१२.२००९**

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.जैतून सलीम बेग
५१/९, मदिना मंझील, हुसेन पटेल मार्ग, माजगाव, मुंबई-१० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह,
कळंबा, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जना माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ तुरूंगाधिकारी,
कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२० / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.३.२००९ |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.१०.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्याने

दि.१९.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे सुनावणीच्या वेळी गैरहजर होते.

आपले पती श्री.सलीम रज्जाक बेग हे कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा येथील कैदेत असून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या ताब्यात आहेत. आपल्या पतीविरूध्द होणाऱ्या अत्याचाराची माहिती आपल्याला मिळणे आवश्यक आहे. परंतु ती दिली जात नाही, अशी तक्रार अपीलकर्त्या श्रीमती जैतून सलीम बेग यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात केली आहे.

श्रीमती बेग यांची तक्रार चुकीची आहे. त्यांनी मागितलेली माहिती मुद्देनिहाय देण्यात आली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, काल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा, जि.कोल्हापूर यांनी दिलेल्या माहितीच्या प्रतीसह लेखी निवेदनाद्वारे आयोगास सादर केले. संबंधित कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.




**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३१.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजीराव भाऊसाहेब बर्गे
बुरूड गल्ली, मु.पो.कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, रयत शिक्षण संस्था,
सातारा, जि.सातारा — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
रयत शिक्षण संस्था, सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२४ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजीराव भाऊसाहेब बर्गे
बुरूड गल्ली, मु.पो.कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा
**अपिलीय प्राधिकारी** तथा सचिव, रयत शिक्षण संस्था,
सातारा, जि.सातारा प्रतिनिधी श्री.बी.जी.धायगुडे
**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
रयत शिक्षण संस्था, सातारा, जि.सातारा प्रतिनिधी डॉ.आर.एच.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.५.२००७ व २२.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.१०.२००७ व २६.६.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.८.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

पदवी परीक्षेला राज्यशास्त्र हा विषय असल्याच्या कारणावरून आपल्या मुलीला रयत शिक्षण संस्थेच्या सरस्वती इंग्लिश स्कूलमधून चार वर्षांच्या सेवेनंतर कमी केले. म्हणून राज्यशास्त्र हा विषय असलेल्या अन्य पाच शिक्षकांबाबतची माहिती आपण मागितली होती. ती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.शिवाजीराव भाऊसाहेब बर्गे यांनी केले.

श्री.बर्गे यांनी सन १९८५, १९८९, १९९५ व १९९६ या काळातील माहिती मागितली होती. संबंधित शिक्षकांची ही वैयक्तिक माहिती असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(जे) अन्वये देता येणार नाही, असे त्यांना विहित मुदतीत कळविले, असे जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, रयत शिक्षण संस्था, सातारा प्रतिनिधी श्री.आर.एच.पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा प्रतिनिधी श्री.बी.जी.धायगुडे यांनी सांगितले.

संबंधित शिक्षकांचा नेमणूक दिनांक, पदवी आदी माहिती वैयक्तिक म्हणून नाकारता येणार नाही. श्री.बर्गे यांना ती जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी, रयत शिक्षण संस्था, सातारा यांनी चार दिवसांत द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.२७.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.हेमंत भागवत अभंगराव
गजराज अपार्टमेंट, गणंजय सोसायटी, युनिट-४,
आझादवाडी, कोथरूड, पुणे अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विधी अधिकारी,
अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक,
अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२५/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२६.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हेमंत भागवत अभंगराव
गजराज अपार्टमेंट, गणंजय सोसायटी, युनिट-४,
आझादवाडी, कोथरूड, पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विधी अधिकारी,
अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे श्री.ए.डी.शेजाळे

**जन माहिती अधिकारी** तथा उपसंचालक,
अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे श्री.टी.आर.धोंडगे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२०.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.६.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२७.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.२६.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

दोन व्यक्तींच्या जात पडताळणी प्रमाणपत्रासंबंधातील माहिती त्रयस्थ पक्षाच्या आक्षेपामुळे नाकारल्याचे आपल्याला कळविण्यात आले. तथापि संबंधित विषय राज्य विधी मंडळापुढे मांडण्यात आला असल्यामुळे ही माहिती नागरिक म्हणून आपल्यालाही मिळाली पाहिजे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.हेमंत भागवत अभंगराव यांनी केले. संबंधित व्यक्तीच्या मुलाने माहिती देऊ नये असे कळविल्यामुळे ती नाकारली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे श्री.टी.आर.धोंडगे यांनी केले. या संदर्भात अपीलकर्त्यास आवश्यक तर न्यायालयीन मार्ग उपलब्ध असल्याचे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विधी अधिकारी, अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे श्री.अे.डी.शेजाळे यांनी केले.

संबंधित माहिती सार्वजनिक विषयाच्या दृष्टीने गोपनीय ठरू शकत नाही. तसेच विधी मंडळापुढे आलेला विषय असल्यास माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार ती माहिती नागरिकांनाही नाकारता येणार नाही. हे लक्षात घेता संबंधित माहिती आठ दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपीलकर्त्यास माहिती देण्यात आल्याचे दि.६.६.२००९ ची अपीलकर्त्याची पोहोच असलेल्या

पत्राच्या प्रतीसह जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक, अनुसूचित जमाती जाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे श्री.आर.जी.कांडेकर यांनी दि.६.६.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. दोन्ही प्रकरणांची माहिती मिळाली असून तक्रार नाही, असे श्री.अभंगराव यांनी नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२२.१२.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सयाजी ऊर्फ बाळू गणपत वाघमारे
गोदरेज गार्डन इनक्लेव्ह टॉवर, ए-१, फ्लॅट नं.२२,
फिरोजशानगर, विक्रोळी(पू) मुंबई-७९ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२९ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सयाजी ऊर्फ बाळू गणपत वाघमारे
गोदरेज गाउर्न इनक्लेव्ह टॉवर, ए-१, फ्लॅट नं.२२,
फिरोजशानगर, विक्रोळी(पू) मुंबई-७९

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सातारा प्रतिनिधी श्री.अंकुश बगाटे

**जन माहिती अधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कराड, ता.कराड, जि.सातारा
विद्यमान श्री.अनिल सोनवणे, तत्कालीन श्री.नितीन माने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१८.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या मोकळ्या जागेचा विकास आराखड्यात समावेश करण्यात आला. गट नं.३४ व १०३४ यांची मोजणी होऊनही माहिती दिली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सयाजी ऊर्फ बाळू गणपत वाघमारे यांनी केले. श्री.वाघमारे यांनी नमूद केलेल्या दोनपैकी एकाच गटाची मोजणी झाली. गट क्र.३४ मध्ये विकास आराखड्याचा संबंध नाही, हे मोजणीमध्ये स्पष्ट झाले. गट क्र.३४ची मोजणीच झालेली नसल्यामुळे ती माहिती उपलब्ध नव्हती. त्यानंतर गट क्र.१०३४ च्या मोजणीचा आग्रह श्री.वाघमारे यांनी धरला. त्यानुसार दि.७.१२.२००६ रोजी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, कराड यांनी पत्र दिले. त्यांनी दि.२४.१.२००७ रोजी मोजणी केली. मोजणी तक्ता व नकाशा दि.७.३.२००७ रोजी प्राप्त झाले. श्री.वाघमारे यांना तो दि.९.३.२००७ रोजी नोदणीकृत टपालाने पाठविला, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कराड श्री.नितीन माने व अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा श्री.अंकुश बगाटे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. जी मोजणी झालीच नव्हती, तिचा नकाशा मागणे व ही माहिती न मिळाल्याची तक्रार करणे, ही अपीलकर्ता श्री.वाघमारे यांची कृती योग्य नाही. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.नितीन माने व अपिलीय प्राधिकारी

श्री.अंकुश बगाटे यांनी माहिती दिली आहे, एवढेच नव्हे, तर संबंधित गटाची मोजणी करून घेऊन नकाशा देण्याची प्रशासकीय कार्यवाहीही केली आहे, हे प्रशंसनीय आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१७.१२.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. मुसा लालभाई तांबोळी
मु.पो.दिघंची, ता.आटपाडी, जि. सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५३७ + ५३८ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. मुसा लालभाई तांबोळी
मु.पो.दिघंची, ता.आटपाडी, जि. सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, सांगली श्री. एन. बी. पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा निरीक्षक, आटपाडी एज्युकेशन
सोसायटी, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली

| अपील क्रमांक | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ५३७ / सांगली | १२.७.२००७ | -- | ५.२.२००८ | -- |
| ५३८ / सांगली | ३.१०.२००७ | १४.११.२००७ | २२.१०.२००७ | -- |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. २२.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २९.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या बदलीच्या अनुषंगाने मागितलेल्या माहितीतील मुद्दा क्र.५ ची माहिती मिळाली नाही. (अपील क्र. ५३७) आटपाडी एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांना कर्मचाऱ्यांच्या वर्गणीतून गाडी दिल्याबाबतचा तपशील संस्थेने दिला नाही, (अपील क्र. ५३८) असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. मुसा लालभाई तांबोळी यांनी केले.

आपल्या कार्यालयाकडील माहिती देण्यात आली असून अपिलाच्या सुनावणीनंतर निर्णय देण्यात आला आहे. तसेच श्री. तांबोळी यांच्या तक्रारींच्या अनुषंगाने कार्यवाही करुन अहवाल सादर करण्यास आटपाडी एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांना कळविण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, सांगली श्री. एन. बी. पाटील यांनी केले.

अध्यक्षांना कर्मचाऱ्यांच्या वर्गणीतून गाडी दिल्याची नोंद संस्थेच्या कागदोपत्री नाही. त्यामुळे त्याबाबत माहिती देण्याचा प्रश्न आला नाही. अन्य माहिती देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, आटपाडी एज्युकेशन सोसायटी, आटपाडी जि. सांगली श्री. यु.एस.शिंदे यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने पाहता देय माहिती अपीलकर्त्यास देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यांत येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

पुणे
दि. १९.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश दिनकरराव गायकवाड
१३२५/२७, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,
जि.कोल्हापूर — उत्तरवादी

(१)**जन माहिती अधिकारी** तथा प्र.कामगार अधिकारी,
(२)**जन माहिती अधिकारी** तथा वरिष्ठ लिपिक,
विधी सल्लागार विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सुरेश दिनकरराव गायकवाड
१३२५/२७, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर श्री.जी.एन.देशमुख

(१)**जन माहिती अधिकारी** तथा प्र.कामगार अधिकारी,
विधी सल्लागार विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर श्री.एन.टी.कांबळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.११.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्याने दि.१९.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जन माहिती अधिकारी तथा प्र.कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी चुकीची व अपुरी माहिती दिली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सुरेश दिनकरराव गायकवाड यांनी केली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्र.कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.प्रकाश चव्हाण सध्या निलंबित असून त्यांनी विहित मुदतीत उत्तरे दिली आहेत. काही मुद्दयांची स्पष्टीकरणात्मक माहिती व तपशील श्री.गायकवाड यांना हवा होता. अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांच्या निर्णयानंतर ती माहिती टपालाने पाठविली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्र.कामगार अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.एन.टी.कांबळे यांनी केले. संपूर्ण माहिती देण्यास तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी विलंब केल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.जी.एन.देशमुख यांनी मान्य केले. मात्र मुख्यत: मानसेवी विधिज्ञांशी करार का करून घेतला नाही व करार करून घेण्याची पूर्तता का केली नाही, अशा स्वरूपाचे हे आक्षेप आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.जी.एम.देशमुख यांनी नमूद केले.

तत्कालीन जन माहिती अधिकारी व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी माहिती विलंबाने दिल्याची अपीलकर्त्याची तक्रार आहे. तथापि मूळ अर्जातील मुद्दयानुसार विहित मुदतीत उत्तर देण्यात आले. त्याचा तपशील अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर देण्यात आला. कराराबाबतची पूर्तता आदि बाबी हा 'माहिती 'चा भाग नसून प्रशासकीय कार्यवाहीचा भाग आहे.

उभय बाजूंची निवेदने व कागदपत्रे पाहता अपीलकर्त्याची शास्तीची मागणी अमान्य करण्यात येत आहे. मात्र विहित मुदतीत मूळ अर्जानुसार योग्य माहिती देण्याची समज जन माहिती अधिकारी तथा प्र.कामगार अधिकारी श्री.एन.टी.कांबळे व वरिष्ठ लिपिक, विधीसल्लागार विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.एस.जी.देवेकर यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२१.१२.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
कलादालन, मु.पो.ता.शिरोळ, जि.कोल्हापूर
(२)श्री.शिवाजीराव केशवराव जाधव
मु.पो.मौजे आगर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,
पंचायत समिती शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** (१)श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी
कलादालन, मु.पो.ता.शिरोळ, जि.कोल्हापूर
(२)श्री.शिवाजीराव केशवराव जाधव
मु.पो.मौजे आगर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.एस.जे.पवार

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा ग्रामविकास अधिकारी,<br>पंचायत समिती शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.ए.आर.कुंभार | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. ११.११.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्याने दि.१९.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

माहिती देण्यास एक दिवस विलंब केला व दिशाभूल करणारी माहिती दिली, त्याचे अकारण जादा शुल्क आकारले. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मौजे आगर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांना शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.प्रसाद गणपतराव धर्माधिकारी व श्री.शिवाजीराव केशवराव जाधव यांनी केली. अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी ४५ दिवसांत अपिलाचा निर्णय दिला नाही. दि.२४.९.२००८ रोजी अपील केले असून दि.७.११.२००८ रोजी तत्कालीन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी निर्णय दिला आहे व दि.११.११.२००८ रोजी उभय बाजूंना पाठविला आहे. श्री.धर्माधिकारी व श्री.जाधव यांनी ग्रामपंचायतीकडील आठ वर्षांच्या कालावधीतील विस्तृत माहिती मागितली होती. ऑगस्ट अखेरपर्यंत लेखा तपासणीचे काम चालू होते व अर्ज दि.१८.८.२००८ चा आहे. या परिस्थितीमुळे माहिती देण्यास एक दिवस उशीर झाला, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, मौजे आगर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.ए.आर.कुंभार यानी केले. अतिरिक्त शुल्क परत करण्याचा आदेश त्यात दिला असून माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे मूळ

अपिलात म्हटले नसल्यामुळे त्याबाबत तपासणी करण्याचा प्रश्न आला नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.एस.जे.पवार यांनी नमूद केले.

प्रथम अपिलाच्या निर्णयाची प्रत व ते पाठविण्याची जावक बारनिशीतील नोंदीची प्रत व अतिरिक्त शुल्क परत करण्याबाबतची कार्यवाही चार दिवसांत पूर्ण करून आयोगास अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अतिरिक्त शुल्क रू.४ मनीऑर्डरने परत करण्याच्या पुराव्यासह पूर्तता अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर श्री.एस.जे.पवार यांनी दि.२१.३.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केला.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.३७.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी आनंदा कापसे
जुना बुधवार पेठ, डांगे गल्ली, डी वॉर्ड पाठीमागची बाजू,
घर नं.२६४६, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ~~अधीक्षक~~ कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी आनंदा कापसे
जुना बुधवार पेठ, डांगे गल्ली, डी वॉर्ड पाठीमागची बाजू,
घर नं.२६४६, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री.डि.जी.मळेकर

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री.सं.ग.शेलार | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १६.९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१०.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. १.१२.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.७.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अर्जदार यांनी मागितलेली माहिती न देता व अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर यांनी अपिलाची दखल न घेता कार्यवाही केली. त्याविरूध्द श्री.शिवाजी आनंदा कापसे यांनी राज्य माहिती आयागाकडे अपील केले आहे.

श्रीमती पुष्पा मारूती कापसे यांनी काही माहिती लेखी स्वरूपात व प्रत्यक्ष पाहण्यासाठी मागणी केली. दारिद्र्यरेषेखाली आपण असल्याचा उल्लेख त्यांनी त्यात केला होता. परंतु त्याचबरोबर शासनाच्या नियमाप्रमाणे तासाला पाच रूपये भरून माहिती पाहण्यास तयार आहे, असेही म्हटले होते. दारिद्र्यरेषेखालील यादीत समावेश असल्याबाबतचा पुरावा त्यांनी सोबत जोडला नव्हता. विहित मुदतीत त्यांना उत्तर पाठविण्यात आले. त्यांच्या वतीने श्री.शिवाजी आनंदा कापसे यांनी अभिलेख अवलोकनासाठी दिलेले अधिकारपत्र, अशा प्रकारची तरतूद नियमात नसल्यामुळे मान्य केले नाही. दरम्यान श्रीमती कापसे यांनी दि.१७.१०.२००८ रोजी दारिद्र्यरेषेखालील यादीतील समावेशाबाबतची कागदपत्रे उपलब्ध करून दिल्यानंतर लेखी

स्वरूपातील माहिती त्यांना त्याच दिवशी पुरविण्यात आली. त्यांच्या वतीने प्रथम अपील श्री.शिवाजी आनंदा कापसे यांनी दाखल केले होते. मूळ अर्जदाराव्यतिरिक्त व्यक्तीने अपील अर्ज दाखल करणे चूक असल्यामुळे तसा निर्णय देऊन अपील निकाली काढण्यात आले, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर श्री.सं.ग.शेलार यांनी केले. ते मान्य करण्यात येत आहे. राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपीलही अशाच स्वरूपाचे असल्यामुळे नाकारण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२२.१२.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कमलाकर दत्ताजीराव धनवडे
११३२, ई-वॉउर्, साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४५ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कमलाकर दत्ताजीराव धनवडे
११३२, ई-वॉर्ड, साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.मिलिंद चव्हाण

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी,
कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्री.शिवाजी भोसले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.१.२००८ व १.३.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.१.२००८ व २९.३.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १८.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-यांनी निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्याने दि.१९.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

नगरपालिकेने केलेल्या कब्जेपट्टीच्या संदर्भात अपीलकर्ता सातत्याने विविध स्वरूपाचे अर्ज करीत असून अपीलकर्ता सन १९३९ पूर्वीच्या माहितीची मागणी करीत आहेत. वेळोवेळी त्याबाबत माहिती देण्यात आली आहे. मात्र विषयांकित अपील नियमानुसार नाही. माहिती मागणीचा मूळ अर्ज श्री.शिवाजीराव दत्ताजीराव धनवडे यांनी केला असून जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्तरावर अपील मात्र श्री.कमलाकर दत्ताजीराव धनवडे यांनी केले आहे, त्यामुळे ते फेटाळले आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, कोल्हापूर यांनी केले. त्यांचा निर्णय कायम करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७.१२.२००९